अशा पुलावरून रेतीने भरलेले डंपर केली आहे. मडगावकर, जिल्हा माहिती अधिका

दै. तरुण भारत, दि. ०५।०६।२०१८

# प्रत्येकाने किमान पाच झाडे लावा

## जनशिक्षण विभागाकडून जागतिक पर्यावरण दिन साजरा

कणकवली

सन १९७२ पासून जागतिक पयावरण दिन साजरा करण्यात येत आहे. पाणी अडवा, पाणी जिरवा, वृक्षांचे संवर्धन करा. प्लास्टिक पिशव्या पर्यावरणासाठी घातक आहेत, यासाठी प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घाला. आपण प्रत्येकाने किमान पाच झाडे आपल्या परिसरात लावावीत. कापडी पिशव्यांचा वापर वाढवावा, असे आवाहन कणकवली कॉलेजचे प्रा. सत्यवान राणे यांनी केले.

मानव साधन विकास संस्था संचलित मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार पुरस्कृत जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्गतर्फे येथील शिवाजीनगरातील गोवेकर हॉलमध्ये आयोजित जागतिक पर्यावरण दिन कार्यक्रमात प्रा. राणे बोलत होते.

यावेळी जनशिक्षणचे संचालक डी. आर. परब, पं. स. सदस्या सौ. दळवी, संचालक रघुनाथ गोवेकर, प्रा. सत्यवान नाईक आदी उपस्थित होते.



**कणकवली : पर्यावरण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना सत्यवान राणे. सोबत डी. आर. परब, सौ. दळवी, रघुनाथ गोवेकर, सत्यवान नाईक.**

**वृक्ष लागवड, संवर्धन करा!**

झाडांची तोड केल्याने होणारे दुष्परिणाम, पाऊस कमी पडणे, दुष्काळ पडणे असे प्रकार घडतात. यासाठी वृक्ष लागवड व संवर्धनाचे आवाहन प्रा. राणे यांनी केले.

गतवर्षी केंद्र सरकारकडून दोन कोटी झाडे लावण्यात आली. यावर्षी ४ कोटी झाडे लावण्यात येणार आहेत, असेही त्यांनी सांगितले. पं. स. सदस्या श्रीमती दळवी यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविकात परब यांनी वृक्षतोडीचे घातक परिणाम, जागतिकीकरणात झाडांचे मूल्यमापन, जैवविविधता याबाबत मार्गदर्शन केले. तसेच वृक्षलागवडीचे आवाहन केले.